साक्षर भारत योजनेकरिता निधी वितरणास तसेच खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः साभाका-२०१८/प्र.क्र.१२१/एस.डी.२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २९ मार्च, २०१९.

<u>संदर्भ:</u>- १) केंद्र शासनाचे क्र.F.No.९-८/२०१४-एन.एल.एम.आय, दि.०७ मार्च,२०१९ चे पत्र
२) शिक्षण संचालक अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र.अपौशि/पू.मा./२०१८-१९/सा.भा./कार्या-५/८६, दि.२२ जानेवारी, २०१९
३) वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३,दि.०२ एप्रिल,२०१८.

<u>प्रस्तावना:-</u>

साक्षर भारत योजना ही योजना राज्यात जानेवारी, २०१० पासून सुरु करण्यात आली होती. सन २००१ च्या जनगणनेनुसार ज्या जिल्हयातील महिला साक्षरतेचे प्रमाण ५०% पेक्षा कमी आहे, अशा राज्यातील १० जिल्हयांचा समावेश साक्षर भारत योजनेत करण्यात आला असून राज्य, जिल्हा, तालूका, ग्रामपंचायत या चार स्तरावरुन सदर योजना राबविण्यात येत होती. सदर योजनेकरिता केंद्र शासनाने संदर्भाधीन दि.०७ मार्च, २०१९ च्या आदेशान्वये केंद्र हिस्स्याचा सर्वसाधारण घटकाकरिता रु.१२४३.८० लक्ष निधी वितरीत केलेला आहे. सदर केंद्र हिस्सा विचारात घेता विचारात घेता, राज्य हिस्स्याचा रू.८,२९,२०,१८७ इतका निधी राज्य हिस्सा म्हणून वितरीत होणे आवश्यक आहे. तथापि, सद्यस्थितीत साक्षर भारत योजनेंच्या सर्वसाधारण घटकाकरिता राज्य हिस्स्यामधून केवळ रु.२७७.४९ लक्ष इतकी रक्कम उपलब्ध आहे. सद्यस्थितीत उपलब्ध निधी विचारात घेऊन साक्षर भारत योजनेकरिता निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

१. साक्षर भारत योजनेकरिता रु. १५,२१,२९,२८०/- (रु.पंधरा कोटी एकवीस लाख, एकोणतीस हजार दोनशे ऐंशी फक्त) इतका निधी खर्च करण्यास या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. "मागणी क्र.ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण, ०४ प्रौढ शिक्षण २००, इतर प्रौढ शिक्षण कार्यक्रम (००) (०६) साक्षर भारत (केंद्र हिस्सा) (कार्यक्रम) (२२०२ एच ४४५), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षांतर्गत सन २०१८-१९ करीता रु.२५०० लक्ष (रू.पंचवीस कोटी) इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. सदर तरतुदीतून रु. १२,४३,८०,२८०/- (रु.बारा कोटी त्रेचाळीस लाख ऐंशी हजार दोनशे ऐंशी फक्त) इतका खर्च भागविण्यात यावा.

३. “मागणी क्र.ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण, ०४ प्रौढ शिक्षण २००, इतर प्रौढ शिक्षण कार्यक्रम (००) (०५) साक्षर भारत (राज्य हिस्सा) (कार्यक्रम) (२२०२ एच ४१८), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)” या लेखाशिर्षांतर्गत सन २०१८-१९ करीता रु.३०० लक्ष (रु. तीन कोटी) इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. सदर तरतुदीतून रु. २,७७,४९,०००/- (रु.दोन कोटी सत्त्याहत्तर लाख एकोणपन्नास हजार फक्त) इतका खर्च भागविण्यात यावा.

४. यासाठी आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना “नियंत्रक अधिकारी” आणि लेखाधिकारी, अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालय, पुणे यांना “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे. नियंत्रक अधिकारी आणि आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर निधी संचालक, अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालय, पुणे यांना विनियोगाकरिता तातडीने उपलब्ध करुन द्यावा.

५. सदर आदेश वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि.२.४.२०१८ रोजीच्या परिपत्रकास अनुसरून अर्थोपाय शाखेने अनौपचारीक संदर्भ क्र.१५६/अर्थोपाय, दि.२७.३.२०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहेत. वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि.२.४.२०१८ रोजीच्या परिपत्रकातील अटींची तसेच परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ४ व ८ मध्ये नमूद अटींची पुर्तता होत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक १,२,३,५,६ व ७ मधील बाबी या आदेशासाठी लागू नाहीत.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२९१३०१०५१०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Govind Balu Kamble

Digitally signed by Govind Balu Kamble
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9197de2bc674839ebe310a15d6bce1dd2d80cb5d5cef5dd249d0ff0f60e4de9d, serialNumber=06b02f2b563d12c922a0a07840d85d1c274f61508e2c94e450344568cfdbe0f5, cn=Govind Balu Kamble
Date: 2019.03.29 13:03:25 +05'30'

(गोविंद कांबळे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री, (शालेय शिक्षण), मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
३. मा. अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
५. महालेखापाल (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
६. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८. स्थानिक निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

९. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
११. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक)महाराष्ट्र राज्य, पुणे
१३. शिक्षण संचालक (अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
१४. वित्त विभाग (व्यय-५/अर्थसंकल्प-८) मंत्रालय, मुंबई
१५. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. सह सचिव/उपसचिव (विद्यार्थी विकास/अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (अर्थसंकल्प) मंत्रालय, मुंबई
१८. निवडनस्ती, (एसडी-२).